मुंबई - बुधवार दि.२५ फेब्रुवारी २००९

## २६/११ बळी पडलेल्यांना मदत व पुनर्वसन सुनावणी
## मानव अधिकार आयोग प्रारंभ

## चार मृतदेहांची ओळख अद्याप पटलेली नाही

२६/११ बाँम्बस्फोटात बळी पडलेल्यांना मदत पुनर्वसनच्या मानव अधिकार आयोगाच्या सुनावणीच्यावेळी "चार मृतदेहांची अद्याप ओळख पटलेली नाहीह्न अशी माहिती रेल्वे अधिका-यांनी दिली.

भारतीय जनता पार्टीचे नेते डॉ.किरीट सोमैयां यांच्या याचिकेची सुनावणी आज मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष न्यायमुर्ती श्री क्षितिज व्यास व श्री सुभाष लाला यांच्या खंडपीठासमोर झाली. २२ शहीद ( ) यांच्यासह १६६ लोक मृत्युमुखी पडले तर ३११ जखमी झाले.

पंतप्रधानांतर्फे देण्यात येणारी दोन लाख रुपयांची मदत व केंद्रीय गृहमंत्रालयाकडून मिळणारी ३ लाख रुपयांची मदत तीन महिने झाल्यानंतरही अधांतरीत आहे असे आज आयोगापुढे डॉ.किरीट सोमैया यांनी सांगितले. केंद्र सरकारने असे स्पष्ट केले आहे की महाराष्ट्र शासनाने या संबंधिचा प्रस्ताव तसेच संबंधित यादी न दिल्यामुळे ही मदत देता आलेली नाही.

जखमींच्या शरिरात अद्याप गोळया आहेत. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था झालेली नाही याकडे डॉ.सोमैया यांनी आयोगाचे लक्ष वेधले. राज्य सरकार व रेल्वे दोघ एकमेकांवर ढकलत आहेत.

**शहीदांसाठी घोषित झालेल्या रु.२५ लाखांपैकी १३ लाख काढून घ्यायचा जी.आर. अद्याप मागे घेण्यात आलेला नाही ही माहिती गृह विभाग**
**ज्या राज्य सरकारने एका हाताने २५ लाख दिले तर गृह विभाग व मदत पुनर्वसन खात्याने दुस-या हाताने काढून घेतले.**

आयोगाने राज्य सरकारला मदत व पुनर्वसना संबंधी झालेल्या कामांची माहिती देण्याचे निर्देश दिले.